# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 25/05/2020 (सोमवार)
(सकाळ)

### चोरी

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर शिवनगर कांद्री येथे दिनांक 20/05/2020 चे 21.00 वा. ते दिनांक 21/05/2020 चे 05.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराच्या समोरील दाराची कडी कलुप तोडुन आत प्रवेश करून, इंजिन ऑईल डबकी प्रत्येकी 25 जि. असा एकुण 100 लि. आईल किं. 15,600/–रू मुद्देमाल चेरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जोसेफ हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि.मी अंतरावर सदभावना कॉलनी पाटणसावंगी येथे दिनांक 19/05/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 20/05/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बळीराम रमेशराव भारती, वय 33 वर्ष, रा. सदभावना कॉलनी पाटणसावंगी, तह. सावनेर यांनी त्यांची एमएच– 40/एएफ– 1340 क्रमांकाची काळया रंगाची पॅशन प्रो मोटरसायकल ही क्वॉटर समोर उभी केली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादींची किं. 25,000 /–रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कृष्णा जुनघरे हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. नरखेड :– दि. 23/05/2020 चे 21:00 वा. ते 21:30 वा. चे सुमारास 23 वर्षीय पिडीत/फिर्यादी या पायरीवर बसल्या असतांना अचानक तेथे आरोपी नामे– रामदास चरणदास मेटागंळे, वय 26 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, नरखेड याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. पीडिता हि ओरडली असता आरोपीने 'तुमच्या मुलीशी लग्न करायचे आहे, लग्न करून दिले नाही तर तुमच्या परिवाराला सोडणार नाही असे म्हणुन शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 354, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मनोज गाढवे 8805405107 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वार्ड क्र. 1, लोनखैरी येथे दिनांक 24/05/2020 चे 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहपत लक्ष्मण सेलोकर, वय 38 वर्ष, रा. लोनखैरी, वार्ड क्र. 1 हे आरोपी क्र. 1) नंदु टेंभरे, रा. लोनखैरी वार्ड क्र. 1 व इतर दोन लोक यांच्या वर असलेले दुकानाचे उधारीचे 5,500/– रू. मागण्याकरिता गेले होते. दरम्यान आरापीने "तु मागेही मला पैसे मागायला आला होता", असे म्हणुन आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर काडीने मारहाण केली. तसेच आरोपीच्या घरचे पाहुन्याने फिर्यादीला पकडुन ठेवुन आरोपीचे वडिलांनी सुद्धा फिर्यादीला काडीने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 326, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मेश्राम 9823453169 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर